दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.६ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## स्वाभीमानी शेतकरी संघटना 'मविआ'मधून बाहेर : राजू शेट्टी

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

राज्यात महाविकास आघाडी सरकारला धक्का बसला आहे. स्वाभीमानी शेतकरी संघटनेनं महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची अधिकृत घोषणा केली आहे. स्वाभीमानीचे नेते राजू शेट्टी यांनी कोल्हापुरात राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत याबाबतचा निर्णय जाहीर केला आहे. यापुढे शेतकऱ्यांसाठी पुन्हा रस्त्यावर उतरुन लढाई लढणार आणि महाराष्ट्र पिंजून काढणार असल्याचं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे. गेल्या दिवसांपासून राजू शेट्टी महाविकास आघाडी सरकारला सोडचिठ्ठी देणार असल्याचं म्हटलं जात होतं. तसे संकेतच राजू शेट्टी यांनी दिले होते. अखेर आज राजू शेट्टी यांनी याची अधिकृत घोषणा केली आहे. मी आज तुमच्या सगळ्यांच्या वतीनं जाहीर करतो की मविआ आणि आमचे सगळे संबंध संपले आहेत. पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊ त्यांना ही परिस्थिती सांगू. दिल्लीवाल्यांनी फसवलं आणि मुंबईवाल्यांनीही फसवलं. आता आम्हाला आमच्या मनगटावर न्याय मिळवून द्यायचाय, असं राजू शेट्टी म्हणाले. महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडल्यानंतर आता राजू शेट्टींची पुढची भूमिका काय असेल याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

### शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महसूल कर्मचारी संपावर

# पनवेल महसूल कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे नागरिकांचे हाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**महसूल कर्मचाऱ्यांच्या गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे राज्य शासनातर्फे सतत दुर्लक्ष केले जात आहे. असा आरोप लावत राज्य शासनाच्या या दुर्लक्षितपणाचा निषेध करण्यासाठी महसूल विभागाचे कर्मचारी संघटनेतर्फे सोमवारपासून बेमुदत संप पुकारण्यात आला आहे. पदोन्नतीचे प्रस्तावा बरोबर महसूल कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आ-हेत. आज संपाचा दुसरा दिवस असून महसूल कार्यालयात शुकशुकाट आहे. त्याचा थेट फटका महसूल व नागरिकांना बसत आहे नायब तह-सीलदार संवर्गातील सरळसेवा भरतीचे प्रमाण ३३ वरून २० टक्के करावे .अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्यामुळे त्यांच्या यादया राज्यस्तरावर एकत्रीत करण्याची प्रक्रीया ही अन्यायकारक असल्याने ती तात्काळ रद्द करन्यात यावी. यासह अनेक मागण्या करत महसूल विभागाचे कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे.**



शासन निर्णय महसुल व वनविभाग दिनांक १० मे २०२१ अन्वये नायब तहसिलदार संवर्ग हा राज्यस्तरीय संवर्ग म्हणून घोषीत करण्यात आलेला आहे व त्यानुसार सर्व अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांच्या सेवाजेष्ठता यादया राज्यस्तरावर एकत्रीत करण्याबाबत शासनाने पत्र काढलेले आहे. परंतु अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्यामुळे त्यांच्या यादया राज्यस्तरावर एकत्रीत करण्याची प्रक्रीया ही अन्यायकारक असल्याने सदर पत्र तात्काळ रद्द करावे, अव्वल कारकून / मंडळ अधिकारी यांना नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देण्याबाबतची आहे ती प्रक्रीया कायम ठेवावी व प्राप्त प्रस्तावास त्वरीत मान्यता द्यावी. अशा पदोन्नतीनंतर संबंधीत कर्मचारी नायब तहसिलदार संवर्गात आल्यानंतर त्यांची सेवाजेष्ठता राज्य स्तरावर एकत्रीत करण्यास संघटनेची हरकत नाही.

अव्वल कारकून / मंडळ अधिकारी यांची पदोन्नतीने नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती झाल्यानंतर त्यांना त्या त्या विभागातच पदस्थापना देण्यात यावी. सरळसेवेने नायब तहसिलदार पदावर नियुक्तीचा कोटा २० % असुन त्यानुसारच विभाग व जिल्हा निहाय कोटा ठरवुन देण्यात यावा व सद-रची पदे सरळसेवा नायब तहसिलदार यांच्यासाठी राखीव ठेवण्यात यावी. सद्य : स्थितीत नायब तहसिलदारांची बरीचशी पदे रिक्त असून त्याचा अतिरीक्त कामाचा ताण अन्य नायब तहसिलदारांवर पडत असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार प्राप्त होईपर्यंत अटी व शर्तीच्या आधारे अव्वल कारकून / मंडळ अधिकारी यांचेतून सदर पदांवर तदर्थ पदोन्नती देण्यात यावी. तसेच पदे उप-लब्ध होताच विहीत कालमर्यादेत नियमीत करणेचे आदेश निर्गमीत करणेत यावे. सद्यस्थितीत मंत्रालय स्तरावर प्रलंबीत असलेल्या विभागनिहाय संपूर्ण पदोन्नती प्रस्तावास १५ दिवसांचे आत मान्यता प्रदान करुन पदोन्नतीचे आदेश निर्गमीत करावे. कर्मचाऱ्यांना विहीत कालमर्यादेत पदोन्नती देण्यात येईल या बाबत शासनाने वेळोवेळी आश्वासीत केलेले आहे. मात्र मंत्रालय स्तरावर होत असलेल्या विलंबामुळे प्रस्तावीत निवडसुची प्रस्तावातील ५० ते ६० कर्मचारी हे पदोन्नतीचे कार्यवाही विहीत वेळेत पुर्ण न झाल्याने त्यांना संधी असुन सुध्दा लाभ न मिळाल्याने विना पदोन्नती सेवा निवृत्त झालेले आहेत. हे अतिशय खेद जनक असुन त्यास शासनच जबाबदार आहे. सामान्य प्रशासन विभागाकडुन प्रस्तावास मान्यता मिळाले नंतर पदोन्नतीचे आदेश मिळाले तरी तसेच महसुल विभागातून विलंब होत असल्याने कर्मचाऱ्यांत प्रचंड नाराजी आहे. विभागातील महसुल सहाय्यकाची पदे मोठया प्रमाणात रिक्त असुन कर्मचाऱ्यां अभावी एकाच महसुल सहाय्यकाकडे २ ते ३ संकलनाचा कार्यभार असुन कर्मचारी प्रचंड दबावाखाली कामकरीत असुन अधिकारी वर्गाकडुन त्रास देण्यात येत आहे. तरी मंत्रालय स्तरावर प्रलंबीत असलेल्या विभागनिहाय संपूर्ण पदोन्नती प्रस्तावास तात्काळ मान्यता प्रदान करुन पदोन्नतीचे आदेश निर्गमीत करणे, महुसल सहाय्यकाची पदे भरणे, इत्यादी मागण्याची घेवून महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.

## महाराष्ट्र विधीमंडळाच्या वतीने विधानसभा व विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित आमदारांसाठी संसदीय प्रशिक्षण कृती कार्यक्रमाचे आयोजन

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे व आ.निरंजन डावखरे यांचाही सहभाग

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र विधीमंडळाच्यावतीने विधानसभा व विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित आमदारांसाठी लोकसभा सचिवालय आणि प्राईड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ०५ आणि ०६ एप्रिल २०२२ रोजी संसदीय प्रशिक्षण कृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याच्या वतीने विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, संसदीय कार्य मंत्री ॲड.अनिल परब, पालकमंत्री कु.आदिती तटकरे, आमदार निरंजन डावखरे, आमदार अनिकेत तटकरे तसेच सभागृहातील इतर ज्येष्ठ सदस्य या प्रशिक्षणास उपस्थित आहेत.



या कार्यक्रमांतर्गत राज्यातील नवनिर्वाचित आमदारांसह एकूण ११० आमदारांनी नोंदणी केली आहे. उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती एम व्यंकैय्या नायडू, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला तसेच महाराष्ट्र विधीमंडळाचे पिठासीन अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये लोकसभा व राज्यसभा सदस्यांची व्याख्याने, शिबिरे, चर्चासत्रे असे लोकप्रतिनिधीभिमुख कार्यक्रम होणार आहेत.

## महावितरणच्या महिला संचालकपदी (स्वतंत्र) ज्योती चिमटे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या महिला संचालकपदी (स्वतंत्र) महापारेषणच्या पुणे परिमंडळातील अधीक्षक अभियंता (संवसु) श्रीमती ज्योती नितीन चिमटे यांची नियुक्ती झाली आहे.



श्रीमती ज्योती चिमटे या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे (COEP) येथील विद्युत संचरण व दूरसंचार अभियांत्रिकी (BE-E&TC) पदवीधर आहेत. १९९८ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) मध्ये त्या कनिष्ठ अभियंता या पदावर रूजू झाल्या होत्या. तदनंतर, महापारेषण कंपनीत त्यांनी सरळसेवा व बढतीव्दारे विविध पदांवर काम पाहिले. २०१७ पासून त्या अधीक्षक अभियंता या पदावर कार्यरत आहेत. श्रीमती चिमटे यांना महापारेषणच्या संचलन व सुव्यवस्था (Operations Maintenance) चाचणी विभाग (Testing)/ दूरसंचारण विभाग (PLCC), उदादिधा (HVDC-Lines) व पारेषण प्रकल्प योजना (Trans Project Scheme) अशा विविध क्षेत्रीय कार्यालयीन स्तरावरील व सांघिक कार्यालयातील कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे, संचालक (संचलन) अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) नसीर कादरी, संचालक (वित्त) अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) आर. एन. मस्के, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता जयंत विके यांनी अभिनंदन केले आहे.

### संक्षिप्त...

## ठाकरे सरकारने थेट ईडीशी घेतला पंगा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीच्या एका अधिकाऱ्यावर केलेल्या गंभीर आरोपांची चौकशी करण्यासाठी मुंबई पोलिसांचे विशेष तपास पथक (एसआयटी ) नेमण्यात आले आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्त विरेश प्रभू यांच्या नेतृत्वाखाली हे पथक काम करेल. त्यांना तपासासाठी लागेल तितका वेळ देण्यात येईल, असे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आज सांगितले.

संजय राऊत यांनी ' ईडी 'चे अधिकारी जितेंद्र नवलानी यांच्यावर खंडणी रॅकेट चालवत असल्याचा व मनी लॉंड्रिंग गुन्ह्यातही त्यांचा सहभाग असल्याचा गंभीर आरोप पत्रकार परिषदेत केला होता. यासंदर्भात त्यांनी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रारही केली होती. त्या अनुषंगाने मुंबई पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी 'एसआयटी' नेमली आहे. राऊत यांनी याबाबतचे पुरावे आर्थिक गुन्हे शाखेकडे देणार असल्याचे सांगितले होते. या तक्रारीची दखल घेत आर्थिक गुन्हे शाखेने नवलानींविरुद्ध प्राथमिक चौकशीला सुरुवात केली होती. आता 'एसआयटी' या प्रकरणाचा सर्व तपास करणार आहे. दरम्यान, 'संजय राऊत यांना कोणतीही नोटीस न देता किंवा चौकशी न करता 'ईडी' कारवाई करीत असेल तर केंद्र सरकारचा कारभार कशाप्रकारे सुरू आहे हे लक्षात येते.

## दिघी-आगरदांडा जलवाहतूक प्रवास बनला संभ्रमाचा

### दोन फेरी बोटमधील प्रवास दरात ५० रुपयांची तफावत



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन व मुरुड या दोन तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटएनाला जोडणारा दिघी बंदरातील 'फेरी बोट' प्रवास प्रवाशांसाठीए सोइस्करए व पर्यटकांना आकर्षित करणारा ठरत आहे. मात्र, या जलवा-हतूक प्रवासामध्ये दोन बोटीतील तिकीट दरातील फरकाने प्रवाशी वर्ग संभ्रमात पडला आहे. याबाबत मेरिटाईम बोर्डाकडे तक्रार करूनही दाद मिळत नसल्याने प्रवाशी संताप व्यक्त करत आहे.

आगरदांडा व दिघी बंदर हे दोन महत्वाचे बंदर आहेत. श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड या तीन तालुक्याला जोडणारा जलमार्ग हा महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे येथे दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, एएएमुरूड, अलिबाग आदी नयनरम्य ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढू लागल्यानंतर पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी उएपयुएक्त ठरणारी जंगल जेटीची निर्मिती करण्यात आली. या जेट्टीवरून सुवर्णदुर्ग शिपिंग मारिन सर्व्हिसेस व दिघी जलवाहतूक संस्था या दोन संस्थेची अधिकृतरित्या दिघी ते आगरदांडा व आगरदांडा ते दिघी अशी फेरी बोट सेवा दिली जात आहे. दिघीहुन सूटनाऱ्या जंगलजेट्टी मध्ये दुचाकी व सहा चाकी वाहन नेण्याची सुविधा असल्याने या मार्गाचा वापर वाहनधारकांकडून मोठया प्रमाणात होतो. मात्र, प्रत्येक प्रवासी भाडे व दोन बोटीमध्ये वाहन भाडे दरात फरक असल्याने प्रवाशांमध्ये संभ्रमाचा सावळा गोंधळ नेहमीच पाहायला मिळत आहे. तिकीट दरात आमची लूट होत असल्याचं आरोप प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

आगरदांडा ते दिघी या एकाच मार्गावर चालणाऱ्या दोन फेरी बोटीच्या तिकीट दरात तफावत असल्याने प्रवासी वर्गात प्रचंड नाराजी आहे. याबाबत मेरिटाईम बोर्डाकडे तक्रार करूनही दाद मिळत नसल्याने प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. तर या दोन्ही बोटीच्या तिकीट दरात मेरिटाईम बोर्डाने लवकरच सुसूत्रता आणावी अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

सुवर्णदुर्ग शिपिंग मारिन सर्व्हिसेस व दिघी जलवाहतूक या दोन संस्थेच्या फेरी बोट मधील प्रवासी भाडे ३० रुपयांनी सारखेच आकारले जाते. मात्र, मोटारसायकल सह चालक असे वाहनांसाठी आकारण्यात येणारे तिकीट दर एका बोटीतील ८० रुपये तर दुसऱ्या बोटीत ५५ रुपये आहे. यामध्ये २५ रुपयांचा तफावत आहे. तर कार, ट्रक अशा अनेक विविध वाहनात अधिक फरक असल्याची प्रवाशांची ओरड आहे.

यावेळी बोलताना दिघी बंदर निरीक्षक प्रकाश गुंजाळ म्हणाले की, दिघी येथील जलवाहतूक करणाऱ्या सुवर्णदुर्ग शिपिंग मारिन सर्व्हिसेस व दिघी जलवाहतूक संस्था या दोन .../२

## सुधागड तालुक्याला विकासनिधीत कायम झुकते माप देणार : आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ असलेल्या अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली बल्लाळेश्वर नगरीचा परिपुर्ण व शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी विकासनिधी कमी पडू देणार नाहीच, याशिवाय सुधागड तालुक्यातील गाव खेड्या पाड्यांचा विकास घडवून जनतेला प्राथमिक व मूलभूत नागरी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुधागड तालुक्याला विकासनिधीत कायम झुकते माप देणार असल्याची ग्वाही पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



सुधागड तालुक्यातील व पाली नगरपंचायत हद्दीतील विविध विकास कामांकरीता तब्बल साडेपाच कोटींचा निधी मंजूर झाला आहे. पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच सुतारवाडी येथे या कामांच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रत संबंधीत पदाधिकाऱ्यांना सुपूर्द करण्यात आल्या आहेत. यावेळी तटकरे बोलत होत्या. खासदार सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते वसंतराव ओसवाल यांच्या माध्यमातून सुधागड तालुक्याचा जास्तीत जास्त विकास घडवून आणण्यासाठी कायम कृतिशील प्रयत्न राहिले. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजना राबवून तालुक्याचा विकास घडवून आणण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष नेहमीच एक पाऊल पुढे राहिला आहे. येथील जनतेने आमच्यावर विश्वास ठेवत कायम भरभरून प्रेम दिले. .../२

## जेएनपीए बंदराने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये केली विक्रमी माल हाताळणी

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीएने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ५.६८ दशलक्ष टीईयू माल हाताळणी केली आहे जी २०२०-२१ मधील ४.६८ दशलक्ष टीईयूच्या तुलनेत २१.५५ टक्के अधिक आहे. जेएनपीएची ही आजवरची कोणत्याही आर्थिक वर्षातील सर्वाधिक कामगिरी आहे, यापूर्वी जेएनपीएने २०१८-१९ मध्ये ५.१३ टीईयूची सर्वाधिक हाताळणी केली होती. आर्थिक वर्ष २०२१-२२ दरम्यान जेएनपीएमध्ये एकूण ७६ दशलक्ष टन वाहतूक हाताळणी झाली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीतील ६४.८१ दशलक्ष टनांच्या तुलनेत १७.२६ टक्के जास्त आहे.



आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये जेएनपीए मध्ये हाताळलेल्या एकूण कंटेनर वाहतूकी पैकी बीएमसीटीने १,२४४,६९४ टीईयू; एनएसआयजीटीने १,१८६,१८१ टीईयू; एपीएमटीने १,८६५,५८७ टीईयू; एनएसआयसीटीने ९४७,८८७ टीईयू आणि जेएनपीसीटीने ४४०,२१० टीईयू हाताळणी केली. आर्थिक वर्ष २०२१-२२ दरम्यान जेएनपीएने मागील वर्षीच्या ६,०९२ रेक आणि ९२१,५१२ टीईयूच्या तुलनेत ६,२७८ .../२

# आजारी शेजारी

करोनाचा कहर संपून वेगाने प्रगती करण्याच्या काळात आपले दोन शेजारी अस्वस्थ आणि अशांत असावेत, हे नुसते कटकटीचेच नाही, तर भारतावर अनेक अंगांनी ताण आणणारे आहे. खाली दक्षिणेत श्रीलंकेत स्थिर सरकार असूनही जवळपास बेबंदशाहीचा माहोल आहे, तर पश्चिमेकडे पाकिस्तानात सर्वशक्तिमान लष्कर आणि आयएसआय यांनी इम्रान खान यांच्या सरकारला दिलेले खांदे काढून घेण्याचे ठरविलेले दिसते. पाकिस्तानात पुढच्या आठ-दहा दिवसांत काय होईल, हे काहीही सांगता येत नाही. फक्त गेल्या काही वर्षांत लष्कराने प्रत्यक्ष सत्ता ताब्यात घेण्याऐवजी संसदीय लोकशाहीचे सोंग चालू ठेवून, कासरा हातात ठेवण्याचे कसब साधले आहे. असे केल्याने जगाचा रोष पत्करावा लागत नाही; त्यामुळे लष्करशहा कदाचित थेट सिंहासनावर बसणारही नाही. तेथे याच नॅशनल असेंब्लीमधून नवे सरकार करायचे, की इम्रान खान यांनी घोषणा केल्याप्रमाणे नव्या निवडणुका घ्यायच्या, याचा निकाल आता पाकिस्तानी सर्वोच्च न्यायालय घेणार आहे. ही सुनावणी मंगळवारी असून, त्याच दिवशी निकाल लागल्यास आश्चर्य वाटायला नको. इम्रान खान संघर्षाच्या भूमिकेत दिसतात. त्यांनी लष्कराविरुद्ध पुकारलेला हा लढा कितपत लढता येईल, हा मोठा प्रश्न आहे. इम्रान यांनी आता हंगामी पंतप्रधान म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश गुलझार अहमद यांचे नाव पुढे केले आहे. इम्रान खान यांना गुलझार अहमद यांच्या निगराणीखाली नव्या निवडणुका हव्या आहेत. अर्थात, ते आता तेथील सर्वोच्च न्यायालयावर अवलंबून आहे. पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायालय अनेकदा लष्कराला अनुकूल निकाल देते असे म्हटले जात असले, तरी काही नेक न्यायमूर्तींनी याआधी पाकिस्तानी लष्कर व सत्ताधाऱ्यांना जबर तडाखे दिले आहेत. पाकिस्तानात इतक्या वर्षांमध्ये कोणत्याही संसदीय, घटनात्मक आणि न्यायालयीन परंपरा घट्ट मुळे रुजवू शकलेल्या नाहीत, ही खरी अडचण आहे. त्यामुळेच, तेथे आज अध्यक्ष, पंतप्रधान, नॅशनल असेंब्लीचे सभापती आणि न्यायालय यांच्यात जो पत्रव्यवहार किंवा विचारविनिमय चालू आहे, त्याला काहीही अर्थ नाही. तो अर्थ एक लष्करशहा क्षणात शून्यवत करू शकतो. पाकिस्तानातील अस्थैर्य भारताला नेहमीच कटकटीचे ठरते. त्यातच, पलीकडे अफगाणिस्तानात धर्मांध तालिबानी सत्तेत आहेत. या दोन्हींचा परिणाम केवळ काश्मीरवर नव्हे, तर एकंदरीतच भारताच्या स्थैर्यावर झाल्याशिवाय राहणार नाही. हे कमी म्हणून की काय, श्रीलंकेतील स्थिती क्षणाक्षणाला हाताबाहेर जाते आहे. तेथेही अध्यक्ष म्हणून बसलेले गोताबया राजपक्ष हे एकेकाळचे लष्करशहाच आहेत. त्यांना तमिळी वाघांचे निर्दालन केल्याचा अनुभव आहे; त्यामुळे सध्या त्यांनी संचारबंदी लागू केली आहे. उद्या प्रसंगी ते तांदूळ आणि गॅस सिलिंडरसाठी निदर्शने करणाऱ्या निष्पाप नागरिकांवर गोळीबार करायलाही मागेपुढे पाहणार नाहीत. श्रीलंकेतील लोकशाहीची वाटचाल बरीच निकोप चालू होती; मात्र राजपक्ष कुटुंबाने देशातील सगळी सत्तास्थाने आपल्या ताब्यात घेतली असून, मनमानी कारभाराने देशाला दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे केले आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या श्रीलंकेला पुन्हा उभे करणे, हे सोपे आव्हान नाही. त्यातच, चीनला भारतीय उपखंडातील प्रत्येक देशाला कायमचे अंकित करून भारताला शह द्यायचा आहे. चीनने हा खेळ नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, पाकिस्तान, भूतान या सर्वच देशांमध्ये चालविला आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर करोनोत्तर युगात भारतासमोर केवळ संरक्षणविषयक नव्हे, तर आर्थिक आव्हानेही उभी ठाकणार आहेत. श्रीलंकेला मदत केली नाही, नेपाळला चुचकारले नाही, भूतानला सांभाळले नाही आणि बांगलादेशाशी सख्य राखले नाही, तर भारताच्या चारही बाजूंनी संघर्षशील शेजाऱ्यांचा वेढा निर्माण होईल. गेल्या काही दिवसांत इम्रान खान आणि लष्करप्रमुख कमर जावेद बाज्वा हे आलटून-पालटून भारताला अनुकूल विधाने करीत आहेत. पाकिस्तानी राज्यकर्ते आणि लष्कराने कायम भारतकेंद्री राजकारण केले. भारतद्वेषी राष्ट्रवाद जोपासला; त्यामुळे देशात अस्थैर्य आले, की भारताला काहीही करून मध्ये आणले जाते. इम्रान यांच्या नॅशनल असेंब्लीतील प्रदीर्घ भाषणातही हे दिसले होते. या वक्तव्यांना काहीही अर्थ नाही. उद्या पाकिस्तानात सार्वत्रिक निवडणूक झाली, तर प्रचाराचा सारा रोख क्षणार्धात भारताच्या विरोधात वळू शकतो. आज पाकिस्तान आणि श्रीलंका या वेगवेगळ्या आजारांनी ग्रासलेल्या शेजाऱ्यांचा भारताला किती उपद्रव होऊ शकतो आणि या स्थितीचा चीन कितपत लाभ उठवू शकतो, ही देशाच्या दृष्टीने सगळ्यांत चिंतेची बाब आहे. सगळा भारतीय उपखंड हा राष्ट्रांच्या सीमांपलीकडे एका अतूट जैविक नात्याने जोडला गेला आहे. त्यामुळेच, कोणताही एक देश अशांत झाला, तरी त्याचा परिणाम इतर सहा-सात देशांवर होत असतो. यातून मार्ग काढण्यात भारताचीच भूमिका महत्त्वाची राहणार आहे. केंद्र सरकार तशी पावले टाकत असेल, अशी अपेक्षा आहे.

# पेण फेस्टिवल : कल्याणची वृषाली मालावडेकर मिस रायगडची अंतिम विजेती

## नवी मुंबईची सानिया सिंघ द्वितीय तर मुरुड-मिठेखारची हिमानी गायकर तृतीय



**दै.रायगड नगरी । पेण**

स्वररंग तर्फे पेण नगरपरिषदेच्या भव्य मैदानावर भरलेल्या पेण फेस्टिवल २०२१ मध्ये रविवारी झालेल्या मिस रायगड स्पर्धेत कल्याणची वृषाली मालावडेकर ही मिस रायगडची अंतिम विजेती ठरली. तर नवी मुंबईच्या सानिया सिंघ हिने या स्पर्धेतील फस्ट रनरअपचे तर मुरुड मिठेखारच्या हिमानी गायकर हिने सेकंड रनरअपचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेतील बेस्ट कॅटवॉक नेहा पाटील (पेण), बेस्ट स्माईलचे स्वप्नाली कळमकर (पाली), बेस्ट हेअरचे कल्याणी पाटील (पेण), बेस्ट फोटोजनिकचे धारा विसारीया (डोंबिवली), बेस्ट पर्सनालीटीचे राणी जैसवाल (कामोठे), बेस्ट कॉस्टयूमचे अंजली गायकवाड (मुंबई) या स्पर्धकांनी पारितोषिके जिंकली. या स्पर्धेत एकूण २१ सौंदर्यवतींनी सहभाग घेतला होता. सर्वानीच आपल्या मनमोहक अदा सादर करून रसिकांना मोहित केले. या स्पर्धेसाठी रसिकांनी विशेषतः युवा वर्गानी मोठी उपस्थिती दर्शविल्याने स्टेज सामोरील प्रांगण खचाखच भरले होते.

विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, कोकणातील प्रसिद्ध उद्योजक शामकांत खातू, युवा नेते वैकुंठ पाटील, उद्योजक यशवंत घासे, राजू पिचिका, प्रकाश झावरे, शर्मिला पाटील, खजिनदार भारती साळवी, स्वररंग उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, सारिका पाटील, अनिकेत साळवी, आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

इन्ट्रोड्यूस राउंड, साडी राउंड, वेस्टन राउंड व ईव्हीनींग गाऊन राउंड अशा चार राउंड मध्ये सादर करण्यात आलेल्या या स्पर्धेची कोरिओग्राफी रुपेश चव्हाण (मुंबई) व त्यांचे सहायक कोरिओग्राफर निखिल बाचल यांनी साकारली. तर लोकशाही न्यूज चॅनलचे अँकर ऋषी देसाई यांच्या उत्कृष्ठ समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. परीक्षक म्हणून सिने अभिनेत्री श्रद्धा पोतदार, डॉ.वैभव ठाकूर, प्रवीण पवार, सेजल सावंत व रायगड शो टॉपर प्रो.अक्षता साळवी यांनी काम पाहिले.

यावेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे नवनिर्वाचित सदस्य मंगेश नेने, दिलीप बापट, समिर साने, प्रशांत ओक व सुधीर जोशी यांचा सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत रायगड, ठाणे, डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई, पेण, अलिबाग, उरण, नागोठणे, कल्याण, रेवदंडा आदि विविध भागांतील युवती सहभागी झाल्या होत्या. गेल्या अडीच वर्षाच्या कोरोनाच्या जागतिक संकट काळानंतर सुंदर असा बहारदार कार्यक्रम सादर केल्याबद्दल स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी व त्यांच्या संपूर्ण टीमला रसिकांनी धन्यवाद दिले. यावेळी निकिता साडी लकी ड्रॉ स्पर्धेची विजेती सौ.सोनल राकेश पवार यांना पैठणी देवून सत्कार करण्यात आला.

# आमदारांच्या पेन्शन व घरांविरोधात भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन रायगड न्यासचे निवेदन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमदारांना जाहीर झालेली मुंबईतली घरे रद्द करावी व सध्या मिळणारी पेन्शन देखील बंद होऊन निवृत्त होणाऱ्याना मिळणाऱ्या सवलती प्रमाणे त्यांना सवलती मिळाव्यात अशी मागणी रायगड जिल्हा भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

आज पनवेल तहसील कार्यालयात तहसीलदार विजय तळेकर यांना या संदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी रायगड जिल्हाध्यक्ष शंकर बगाडे, अला-उद्दीन शेख, पनवेल महानगर प्रमुख किरण बाथम, अरुण पालांडे, नितीन जोशी, संतोष ठाकूर, गणपत वरगडा, साबीर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

समाजात वावरताना आमदार, खासदार यांच्या उत्पन्नात झालेली अमर्याद वाढ,कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधिंचे अनपेक्षित वाढणारे उत्पन्न हे सर्वत्र पहायला मिळते. म्हणजेचे समाजातील वाढलेला भ्रष्टाचार कुणालाच आक्षेपार्ह वाटत नाही. म्हणजेच राजकारणातील अशा घटकांना अशा वाढीव पेन्शनची गरज नाही. त्यामुळे सरकारने या निर्णयाचा पुनर्वीचार करून हा निर्णय रद्द करावा असे मत जिल्हाध्यक्ष बगाडे व अण्णा हजारेंचे विश्वस्त सचिव अलाउद्दीन शेख यांनी केले.

# कु.किरण सिद्धू तळेकर यांची महाराष्ट्र राज्य समन्वयक पदी निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग राज्य समन्वयक अन्य अत्याचार प्रतिबंधक कायदा या विभागाच्या समन्वयक पदी पन-वेल शहर जिल्हा काँग्रेस महिला विभागाच्या जिल्हा सचिव कुमारी किरण तळेकर यांची निवड झाली आहे कुमारी किरण तळेकर या पनवेल जिल्हा काँग्रेसमध्ये सक्रिय सहभाग असून त्यांची गुणवत्ता पाहून सिद्धार्थ भाऊ हत्ती हंबीरे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनुसूचित जाती विभाग व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे प्रभारी मनोज बागडी यांनी त्यांच्या नावाची शिफारस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश लीलोठीया यांच्याकडे केली होती.



तेव्हा त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र मध्ये होणाऱ्या दलितांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी किंवा अन्याय अत्याचार प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी यासाठी काँग्रेसच्या वतीने त्यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष भाई आर सी घरत, पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा निर्मला म्हात्रे, पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्ष भारती जळगावकर, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती पक्षाचे जिल्हाध्यक्ष तसेच पनवेल शहर जिल्हा काँग्रेस पक्ष प्रवक्ता मोहन गायकवाड, जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा अनुसूचित जाती विभाग माया अहिरे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, तसेच समाजातील विविध घटक यांनी त्यांचे खास अभिनंदन केले आहे. लवकरच त्या दोन दिवसाच्या दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणार असून तेथे अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष खासदार राहुल गांधी हे त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दिघी-आगरदांडा जलवाहतूक प्रवास बनला संभ्रमाचा

संस्थानी भाडे वाढ होण्यासाठी मागणी केली होती. त्यानुसार सुवर्णदुर्ग शिपिंग मारिन सर्व्हिसेस यांचे भाडे वाढ मंजूर झाले आहे. तशीच दिघी जलवाहतूक संस्थेची मागणी प्रलंबित आहे. त्यामुळे या प्रवासातील तिकीट दरात तफावत आहे.

## सुधागड तालुक्याला विकासनिधीत कायम झुकते माप देणार : आदिती तटकरे

त्यामुळे जनसेवेच्या उदात्त दृष्टीकोनातून सुधागड तालुक्याच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही आदिती तटकरे यांनी दिली.

निधिद्वारे सुधागड तालुक्यात व पालीत मोठ्या प्रमाणावर विकास होईल असा विश्वास नगराध्यक्षा गीता पालरेचा यांनी व्यक्त केला. पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे व खासदार सुनिल तटकरे यांच्या प्रयत्नांतून विविध योजनांअंतर्गत हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यावेळी सुधागड तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाली नगराध्यक्षा गीता पालरेचा, तालुकाप्रमुख रमेश साळुंखे व सुधागड तालुका समन्वय समिती अध्यक्ष अभिजीत चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालकमंत्री आदिती यांचे आभार व्यक्त केले. यापुढे देखील विकास कामांबाबत व निधीबाबत सुधागड तालुक्याला कायम झुकते माप देण्यात येईल असे आश्वासन अदिती तटकरे यांनी यावेळी दिले.

## जेएनपीए बंदराने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये केली विक्रमी माल हाताळणी

कंटेनर रेक आणि १,००७,६६७ टीईयूची हाताळणी केली. तसेच, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये एनएसआयजीटी आणि बीएमसीटीने अनुक्रमे १.१८६ दशलक्ष आणि १.२४५ दशलक्ष टीईयू हाताळून प्रथमच १ दशलक्ष टीईयूचा टप्पा ओलांडला आहे.

त्यांच्या कामगिरीमध्ये अनुक्रमे ५२.१२ टक्के आणि ३३.३९ टक्के वार्षिक वाढ नोंदवली गेली.जेएनपीएच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये जेएनपीएने केलेली ५.६८ दशलक्ष टीईयूची ऐतिहासिक कामगिरी ही आमच्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्यासाठी आम्ही करत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या उल्लेखनीय कामगिरीसाठी आमच्या सर्व कर्मचारी व भागधारकांचे अभिनंदन केले आहे त्यांच्या बहुमूल्य योगदाना शिवाय ही कामगिरी करणे शक्य नव्हते.

जेएनपीए देशाच्या आर्थिक विकासा मार्ग प्रशस्त व गतिमान करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी म्हटले आहे.जेएनपीएची ही ऐतिहासिक कामगिरी आयात-निर्यात व्यापार, सागरी व बंदर क्षेत्रातील जेएनपीएचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करते. जेएनपीए जागतिक दर्जाच्या सुविधा विकसित करून जागतिक व्यापार समुदायाच्या पहिल्या पसंतीचे बंदर बनून कार्यक्षमतेत सातत्याने वाढ करण्यासाठी प्रयत्नशील राहील.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
(हक्कसोड पत्राबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ.क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | तळोजा ५५+ ९०० | तळोजा पाचनंद ७१ | १२४/५अ<br>१२४/५ब<br>१२४/५क | ०-३१-०<br>०-०८-०<br>०-३५-० | ५०० चौ.मी. | भूखंड क्र. ७, सेक्टर-२४, क्षेत्र ५०० चौ.मी. | **कै. इंदिरा जनार्दन बापट (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. विजयप्रकाश जनार्दन बापट<br>**हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३१७७/२०१६, दि. २८.०४.२०१६ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. उदय जनार्दन बापट** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |
| | | | | | | | **कै. चंद्रप्रभा प्रभाकर वैद्य (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. विजय प्रभाकर वैद्य<br>२) श्री. अरुण प्रभाकर वैद्य<br>३) श्री. प्रदीप प्रभाकर वैद्य<br>४) श्रीमती सिमा विवेक वैद्य<br>५) श्रीमती तन्वी विवेक वैद्य<br>**हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ४६१०/२०१६, दि. २२.०४.२०१६ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. सुधीर प्रभाकर वैद्य** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |
| | | | | | | | **कै. दत्तात्रय उर्फ दत्ताराम धोंडु राणे (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती वैशाली विश्वनाथ तावडे<br>२) श्रीमती रजनी अशोक सावंत<br>**हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३०६५/२०१६, दि. ०७.०४.२०१६ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. दिलीप दत्तात्रय उर्फ दत्ताराम राणे** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |
| | | | | | | | **कै. भास्कर दामोदर एकलहारे (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. सुहास भास्कर एकलहारे<br>२) श्रीमती दर्शना दिलीप कुलकर्णी<br>**हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ३३५६/२०१६, दि. ०६.०४.२०१६ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. नितीन भास्कर एकलहारे** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |
| | | | | | | | **कै. पुनाजी तातोजी राणे (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. सुधाकर पुनाजी राणे<br>२) श्रीमती आशा हेमंत चव्हाण<br>३) श्री. मनोहर पुनाजी राणे<br>४) श्री. रविंद्र पुनाजी राणे<br>५) श्री. सुरेश पुनाजी राणे<br>**६) कै. भास्कर पुनाजी राणे (मयत) तर्फे वारस**<br>६.१) श्री. अशोक भास्कर राणे<br>६.२) श्रीमती अर्चना जितेंद्र सावंत<br>**हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत.** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-२, दस्त क्र. ४३७४/२०१६, दि. ११.०६.२०१६ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. दिनकर पुनाजी राणे** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०११/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ज्येष्ठ गजलकर ए. के. शेख यांच्या अमृतमहोत्सवी गौरवग्रंथाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

येथील ज्येष्ठ नागरिक संघात गुरुवारी (दि. ३१ मार्च) नसिमा फाउंडेशन, गजल ग्रुप आणि कोकण मराठी साहित्य परिषद, पनवेल शाखेच्या वतीने सहा पुस्तकांचे प्रकाशन झाले. यानंतर रंगलेल्या गजल मुशायर्यात मान्यवर गजलकारांनी आपल्या गजल सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

यावेळी गजल एके गजल हा संपादक रोहिदास पोटे, तसेच सहसंपादक संदीप बोडके यांनी संपादित केलेला ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांच्या वयाच्या अमृत महोत्सवानिमित्त निर्मित गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. त्याचबरोबर गणेश म्हात्रे यांचे मन ओथंबुन आले हा कवितासंग्रह, वाय. के. शेख यांचा चांदणफुले हा कवितासंग्रह, डॉ. बाळासाहेब लबडे यांचा एक कैफियत हा गजलसंग्रह, डॉ. राम पंडित यांचा मात्रिक छंद, ए. के. शेख आणि प्रा. फातिमा मुजावर या गुरुशिष्य जोडीचा मोरपंखी गजल हा तरही गजलसंग्रह ही पुस्तके प्रकाशित करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष आणि उद्योजक जे. एम. म्हात्रे, तसेच माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला उपस्थित होते. वक्ते म्हणून दिवाकर वैशंपायन, प्रा. एम. एम. कांबळे, रोहिदास पोटे, मीनल वसमतकर, डॉ. मनीषा बनसोडे, डॉ. अविनाश पाटील यांनी प्रकाशित पुस्तकांवर अभ्यासपूर्ण विवेचन केले, तसेच सर्वांना सोप्या शैलीत पुस्तकांची ओळख करून दिली. चिपळूण येथील शाहीर खेरटकर यांनी ए. के. शेख रचित पनवेलचा पोवाडा सादर करून कार्यक्रमात बहार आणली. यावेळी रंगलेल्या गजल मुशायर्यात डॉ. सुभाष कटकदौंड, पूजा नाखरे, रंजना करकरे, ॲड. माधुरी थळकर, डॉ. सामिया शेख, आबिद मुनशी, समीर शेख, प्रमोद खराडे, स्मिता हर्डिकर यांनी आपल्या गजल सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले, तर आभार ॲड. माधुरी थळकर यांनी मानले.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# जनसामान्यांच्या व्यथा जाणणारे व्यक्तिमत्त्व महेंद्र घरत आमदार व्हावेत : शहाबाजकर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन त्यांच्या व्यथा अडीअडचणी जाणून त्या पूर्ण करण्यासाठी नेहमीच तत्परता दाखवणारे काँग्रेसचे धडाडीचे नेतृत्व रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत हेच जनतेच्या समस्या मार्गी लावण्यासाठी हे निस्वार्थी व्यक्तीमत्व खऱ्या अर्थाने आमदार व्हावेत. असे भजनसम्राट, महादेवबुवा शहाबाजकर यांनी आपले मत व्यक्त केले.



रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सन्मा. महेंद्रशेठ घरत यांचा जासई काँग्रेस कमिटीतर्फे भजनसम्राट महादेवबुवा शहाबाजकर यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना महादेव बुवा शहाबाजकर म्हणाले की, सर्व सामान्यांची जाण असणारे व शून्यातून विश्र् निर्माण करणारे महेंद्र घरत हे जिल्हाध्यक्ष झालेत तसेच एकवेळ आमदार व्हावेत व भविष्यात होतीलच. समाज्यातील दिन गरिबांची जाण असलेला नेता म्हणजे महेंद्र घरत आहेत.

सालाबादप्रमाणे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर जासई काँग्रेस कमिटीतर्फे श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. यंदा या महापुजेचे १४ वे वर्ष होते त्या निमित्ताने भजनसम्राट महादेवबुवा शहाबाजकर यांच्या शुश्राव्य भजनाचा कार्यक्रम झाला.त्यांची कन्या मिनल पाटील व नातू कु.गंधर्व पराग शहाबाजकर यांनी त्यांना साथ दिली.

या महापूजेसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव संतोष केणे, पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आर. सी घरत, रायगड काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, ह. भ. प धावजीशेठ पाटील, उपाध्यक्ष. किरिट पाटील, कल्याण जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष. राहुल केणे, उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, पनवेल तालुका काँग्रेस अध्यक्ष. नंदराज मुंगाजी, खालापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष कृष्णा पारिंगे, मा. जि. प. सदस्य डॉ. मनिष पाटील, पनवेल पं. स. माजी उपसभापती वसंत काठावले, रायगड युवक अध्यक्ष निखिल ढवळे, महाराष्ट्र फिशर मॅन संघटनेचे कोकण अध्यक्ष मार्तंड नाखवा, पनवेल शहर जिल्हा ओ. बी. सि. सेल अध्यक्ष वैभव पाटील, रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष. उमेश भोईर, उरण विधानसभा युवक अध्यक्ष रोहित घरत, रायगड काँग्रेस महिला उपाध्यक्षा संध्याताई ठाकूर, उरण तालुका महिला अध्यक्षा रेखाताई घरत, निर्मला पाटील, उरण तालुका सेवादळ अध्यक्ष कमलाकर घरत, परशुराम भोईर, जयवंत पाटील, भालचंद्र घरत,जासई विभागीय अध्यक्ष विनोद पाटील, शंकर ठाकूर, राजेंद्र भगत, महेंद्र मुंबईकर, जगदीश पाटील, विवेकानंद म्हात्रे, विक्की पाटील, योगेश रसाळ, बापु मोकल, बाळा पाटील तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी रमेश पाटील, संजय ठाकूर, वंदना पाटील, निराबाई म्हात्रे, यशवंत घरत, विवेक म्हात्रे, आदित्य घरत यांचे कौतुक केले. तसेच जासई काँग्रेस कमिटी, महिला कमिटी, युवक कमिटी यांचे आभार मानले.

# एसटी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा उत्साहात संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल-उरण एसटी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा नुकतीच पनवेल बस स्थानकात चंद्रकांत आनंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, सभेला ८८ सेवानिवृत्त एसटी कर्मचारी उपस्थित होते. प्रथम मृत पावलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली, त्यानंतर सर्व निवृत्त उपस्थित कर्मचाऱ्यांचे संघटने मार्फत स्वागत करण्यात आले.

उपाध्यक्ष एन.ए. चव्हाण यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सध्या अस्तित्वात असलेली कमिटीच २०२२ पर्यंत कार्यरत राहील, तसा प्रस्ताव त्यांनी मांडला. त्या प्रस्तावा बाबत बी. बी. पाटील यांनी सर्वांची मते जाणून घेतली. सेवानिवृत्त सर्व कर्मचाऱ्यांनी त्या प्रस्तावास एक मताने संमती देत प्रस्ताव स्वीकारला. प्रस्तावाला कुठलाही विरोध करण्यात आला. नाही. संघटनेचे सल्लागार ॲड. विद्याधर मोकल यांनी नवीन सभासदांची नोंदणी करून घेतली, त्यावेळी सर्वांनी एकोप्याने राहून संघटनेला सहकार्य करण्याचे ठरले. त्याचप्रमाणे सभा खेळीमेळीच्या व उत्साहाच्या वातावरणात पार पडली. त्यावेळी सी. आर. काळे, एच. आर. नाईक, गिरीश ठाणगे, मधुकर शिंदे, श्रीमती शैला पितळे, श्रीमती सीमा देशमुख, के. पी. म्हात्रे, सौ. आशा विलवर्ण, सौ. येराडकर, प्रकाश लाखण, अनिल झिराडकर, ए. एम. चौधरी, एस. एस. शिंदे, एस. के. म्हात्रे, एस. बी. सावळकर, तुकाराम पाटील, के. एस. पाटील, नितीन वेदक, एकनाथ पाटील, राहुल सोनावणे आदी उपस्थित होते.

# अन्यायग्रस्तांच्या न्यायहक्कासाठी मी सदैव आपल्यासोबत : ॲड.उमेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

काँग्रेस सेवा फाऊंडेशन, रायगड जिल्हा अध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस माजी चिटणीस उमेश ठाकूर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषणसाठी बसलेल्या अन्यायग्रस्त जी.एन.एम. बंधपत्रित अधिपरिचारीका आणि त्यांना सहकार्य करणारे समाजक्रांती आघाडी रायगड जिल्हा अध्यक्ष बी. जी. पाटील यांची स्वेच्छा भेट घेत अन्यायग्रस्तांच्या न्यायहक्कासाठी मी सदैव आपल्यासोबत असल्याचे आश्वासन दिले आहे.


१८ महिन्यांचे शासकीय नियुक्ती आदेश मिळण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सन २०१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व सन २०१९-२० मध्ये उत्तीर्ण अधिपरिचारीकांचे उपोषण आंदोलन दि. २१ मार्चपासून सुरुच आहे. दरम्यान, उपोषण मागे न घेतल्यास आंदोलक अधिपरिचारीका यांची नर्सिंग रजिस्ट्रेशन बंद करण्याची धमकी आरोग्य उपसंचालक ठाणे विभाग यांनी पत्राद्वारे दिली असल्याचा आरोप बी.जी. पाटील यांनी केला आहे. तर आम्हाला आमचे १८ महिन्यांचे आदेश मिळाल्याशिवाय आम्ही आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार अधिपरिचारिकांनी व्यक्त केला आहे.

नुकताच काँग्रेस सेवा फाऊंडेशन, रायगड जिल्हा अध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस माजी चिटणीस उमेश ठाकूर यांनी या आंदोलनास भेट दिली आणि आत्मियतेने विचारपूस केली. यावेळी संवाद साधताना त्यांनी शासन आणि प्रशासन यांच्या अन्यायकारी भूमिकवर टीका केली. तसेच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी पर्वात युवा वर्गाला रोजगारासाठी आंदोलन करावे लागत असल्याची खंत व्यक्त करताना आम्ही सदैव आपल्या सोबत आहोत, आपल्या प्रश्नासाठी आम्ही हरेक विधायक पाऊल उचलू या शब्धांमध्ये उमेश ठाकूर यांनी आपला पाठींबा दर्शविला आहे.



# जेष्ठ नागरिक संघ रोह्याच्या अध्यक्षपदी पांडुरंग सरफळे यांची निवड

**दै.रायगड नगरी । कोलाड नाका**



रोहा तालुक्यातील जेष्ठ नागरीक संघ रोहाच्या अध्यक्षपदी पांडुरंग बालोजी सरफळे (रावसाहेब) यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे त्यांच्या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे जेष्ठ नागरिक सभागृह रोहा येथे सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी निवड करण्यात आली.

सदर बैठकित अध्यक्ष पांडूरंग सरफळे उपाध्यक्षपदी शांतराम गायकवाड, चिटणीस सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटिल यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी समिती वर सुधाकर वालेकर, मारुती राऊत, बाळाराम शेळके, नंदकुमार भादेकर, शैलेजा देसाई यांची देखील निवड करण्यात आली.

अध्यक्ष पदावर निवड झालेले पांडूरंग सरफळे यांना सहकारक्षेत्राचा गाडा अभ्यास आहे. रोहा येथील जय भवानी पतसंस्थेच्या चेरमन पदी ते गेली २५ वर्ष कार्यरत आहेत. या पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक दुर्बल घटकांच्या आर्थिक अडचणी दुर करण्याचे समाजपयोगी काम ते करित आहेत. शासकीय सेवेत अभियंता पदावर काम केले असल्यामुळे प्रशासनाचा अनुभव आहे. तसेच निवड झालेले सर्वच पदाधिकारी हे शासकिय व निमशासकिय सेवेत निवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा ही संघटनेला होणार आहे. सध्या ऑनलाईन चे युग आहे यामधे जेष्ठ नागरिकांना अनेक समस्या भेडसावत आहेत त्यांच्या समस्या सोडवून त्यांच्या जीवनात आनंद कसा निर्मान करिता येईल हे काम संघटना करणार आहे या संघटनेच्या कामाला अधिक गती व अनमोल असे मार्गदर्शन मिळण्याकरिता उपसमिती निवडण्यत आली.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, **श्री.चंद्रकांत भिवा पाटील,** रा.घर नं.२९८, नावडे, कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.६५३, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.२१ सी प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. तसेच वर नमूद शेतकरी त्यांचा मुलगा व माझे अशिल श्री.प्रमोद चंद्रकांत पाटील रा.नावडे पनवेल यांना खाली वर्णन केलेला भूखंड बक्षिसपत्राने कायमस्वरुपी देत आहेत.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ६५३ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १७ | २१ सी | २९९.२८ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसा.,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

मा.पांडे साहेब
**ॲड.हेमा एस. भगत**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.४३३/२०२२
ने.ता.०६/०५/२०२२

**श्रीमती.पल्लवी मनिष सुरी**
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ए-३०३, रत्नप्रभा, दिनदयाळ रोड, ठाकूरवाडी,
डोंबिवली (वेस्ट), पोस्ट : विष्णूनगर, कल्याण, ठाणे अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वहाळ सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार ह्यांचा मुलगा कु.मोहित मनिष सुरी याचा जन्म दि.१५/१०/२०१९ रोजी वहाळ, ता.पनवेल येथे जन्म झाल्या असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्याच्या जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कु.मोहित मनिष सुरी ह्या वर नमूद तारखेस व ठिकाणी जन्म झालेला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.५/४/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

**अर्जदारातर्फे वकील**
**विवेक सदाशिव तावडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४७५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१४/०६/२०२२

**१) श्रीमती.संपदा संजय महाडिक,** वय : ५४
**२) हर्षदा संजय महाडिक,** वय : ३२
**३) प्रसाद संजय महाडिक,** वय : २८
सर्व रा.बी/९०३, मातोश्री पार्क सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित, उदयश्री रोड, भांडूप (पूर्व) मुंबई-४०००४२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. संजय जगन्नाथ महाडिक** यांचे निधन दि.१९/०१/२०२२ रोजी उपासनी सुपर स्पेसिअलीटी हॉस्पिटल प्रा.लि.मुलुंड, मुंबई येथे झाले आणि अर्जदार **१) श्रीमती.संपदा संजय महाडिक वय : ५४, २) हर्षदा संजय महाडिक वय : ३२ आणि ३) प्रसाद संजय महाडिक वय : २८** सर्व रा.बी/९०३, मातोश्री पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था, उदयश्री रोड, भांडूप (पूर्व) मुंबई-४०००४२, यांनी या कोर्टात सदर **मयत संजय जगन्नाथ महाडिक** यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील (५० टक्के अविभक्त हिस्सा) सदनिका क्रं.४०२, चौथा मजला, राधे हेरिटेज, ए विंग, बिल्डींग नं.२, सर्वे नं.११०, ११३/१, रा.पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड (क्षेत्रफळ : ३२.५२ चौ.मी.कारपेट)**

**कै.संजय जगन्नाथ महाडिक** यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**अर्जदारातर्फे वकील**
**विवेक सदाशिव तावडे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०५/२०२२

**१) श्रीमती.कोमल सुनील धायगुडे,** वय : २६
**२) कुमार अद्वैत सुनील धायगुडे,** वय : ०३
**३) श्रीमती.दिपाली दत्तात्रय धायगुडे,** वय : ३०
**४) कुमार यज्ञेश दत्तात्रय धायगुडे,** वय : १०
**५) शिरमाबाई जगन्नाथ धायगुडे,** वय : ४९
सर्व राहणार गाव : विठ्ठलवाडी (घोरपडी),
तालुका : कवठेमहाकाळ, जिल्हा : सांगली,
महाराष्ट्र ४१६४०३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. सुनील जगन्नाथ धायगुडे** यांचे निधन दि.०९/०८/२०२० रोजी पनवेल येथे झाले असून व **कै.दत्तात्रय जगन्नाथ धायगुडे** यांचे निधन दि.१८/१२/२०२१ रोजी गाव : जत, तालुका : जिल्हा : सांगली येथे झाले असून अर्जदार **१) कोमल सुनील धायगुडे, २) अद्वैत सुनील धायगुडे ३) श्रीमती.दिपाली दत्तात्रय धायगुडे, ४) कुमार यज्ञेश दत्तात्रय धायगुडे, ५) शिरमाबाई जगन्नाथ धायगुडे,** सर्व रा.विठ्ठलवाडी (घोरपडी), तालुका : कवठेमहाकाळ, जिल्हा : सांगली महाराष्ट्र ४१६४०३ यांनी **कै.सुनील जगन्नाथ धायगुडे** व **कै. दत्तात्रय जगन्नाथ धायगुडे** यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील सदनिका नंबर ४०१ (मधील ५0% अविभक्त हिस्सा), चौथा मजला, तुळशी आंगण, प्लॉट-१५, सेक्टर-६, करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ क्षेत्र ४१.९१ चौरस मीटर बिल्टअप अशा वर्णनाची मिळकत**

**कै.सुनील जगन्नाथ धायगुडे** व **कै.दत्तात्रय जगन्नाथ धायगुडे** यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**अर्जदारातर्फे वकील : कुंदन मुंबईकर**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.सिव्हील जज्ज ज्यु.डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०६/२०२२

**१) सौ.भारती मारुती इपते**
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड
**२) सौ.गिता रमेश पाटील**
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.दर्शन अपार्टमेंट, गालानगर, एम.आर.डी.रस्त्यासमोर
नालासोपारा, वसई (ई), ता.पालघर अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

अर्जदार क्र.१ व २ ह्यांनी **कै.हरी मोहन अग्रवाल** यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा दिवाणी चौकशी अर्ज या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ व २ ह्या **कै.हरी मोहन अग्रवाल** यांच्या कन्या आहेत. **कै.हरी मोहन अग्रवाल** यांचा मृत्यू दि.०४/०७/२०२१ रोजी मुंबई येथील महानगरपालिका हॉस्पिटल येथे झाला. तर त्यांची पत्नी नामे **भिमा हरी अग्रवाल** यांचा मृत्यू दि.१६/०७/२०२० रोजी झाला. तर **कै.हरी मोहन अग्रवाल** यांची मुलगी नामे **अनविता अंकुश बारसकर** हिचा मृत्यू दि.१५/११/२०२० रोजी कोणतेही अपत्य मागे न ठेवता झाला.

२) मयत **कै.हरी मोहन अग्रवाल** ह्यांनी त्यांचे हयातीत दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग, शाखा उरण येथे फिक्स डिपॉझिटमध्ये काही रक्कम ठेवली होती त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**एफ.डी.क्र.१**
**१) बँकेचे नाव :- दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**
**२) शाखा :- उरण, ता.उरण, जि.रायगड**
**३) एफ.डी.क्रमांक :- ०६०२/८२१५५/१**
**४) एफ.डी.रक्कम :- ७५,०००/- रुपये**
**एफ.डी.क्र.२**
**१) बँकेचे नाव :- दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**
**२) शाखा :- उरण, ता.उरण, जि.रायगड**
**३) एफ.डी.क्रमांक :- ०६०२/८९९९/३३३०**
**४) एफ.डी.क्रमांक :- ५०,०००/- रुपये**
**एफडी क्र.३**
**१) बँकेचे नाव :- दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**
**२) शाखा :- उरण, ता.उरण, जि.रायगड**
**३) एफ.डी.क्रमांक :- ०६०२/८१७४४/४**
**४) एफ.डी.क्रमांक :- १,५०,०००/- रुपये**
**एफडी क्र.४**
**१) बँकेचे नाव :- दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**
**२) शाखा :- उरण, ता.उरण, जि.रायगड**
**३) एफ.डी.क्रमांक :- ०६०२/८१९३६/३**
**४) एफ.डी.क्रमांक :- १,००,०००/- रुपये**

वरील नमूद केल्याप्रमाणे सदरहू रक्कम रुपये ३,७५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख पंच्याहत्तर हजार मात्र) तसेच त्यावरील पुढील व्याज अर्जदारांना वारस या नात्याने मिळणेकरिता वारस दाखल्याची आवश्यकता आहे व त्याकरिता अर्जदार यांनी **कै.हरी मोहन अग्रवाल** यांचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा चौ.अर्ज दाखल केला आहे. सदर चौकशी अर्जाच्याकामी अर्जदार यांनी केलेल्या मागणीबाबत जर कोणाला हरकत घ्यायची असेल तर ती त्याने सदरची नोटीस जाहीर झाल्यापासून १ महिन्याच्या आत उरण येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात घेण्याची आहे. १ महिन्यानंतर आलेल्या हरकतीला फेटाळण्यात येईल याची तमाम जनतेने दखल घ्यावी.

दि.०५/०४/२०२२

**सही/-** **क.लिपीक** **उरण कोर्ट दि.न्याया** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **उरण कोर्ट दि.न्याया**

# संक्षिप्त...

## पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील भुसार मोहोल्ला मशिदीच्या बाजूला पाण्याच्या तलावाजवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वयोगटातील, उंची ५.५ इंच, डोक्याचे व दाढीचे केस वाढलेले काळे, मिशी बारीक काळी, चेहरा उभट असून अंगात फुल बाह्याचा शर्ट, बाह्या फोल्ड केलेल्या आहेत तसेच निळ्या रंगाची ट्रॅकपँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास सहा.पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे यांच्याशी संपर्क साधावा.

## भाऊसाहेब राऊत विद्यालयातील विद्यार्थींना सायकलचे वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रोटरी क्लब ऑफ ठाणे पूर्व ने कर्जत तालुक्यातील स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब राऊत विद्यालय कशेळे व चिं- चवली- डिकसळ संस्थेतील विद्यार्थ्यांना ५० सायकलींचे वाटप करण्यात आले.

स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब राऊत यांनी गरीब, गरजू आणि आदिवासी मुलां- मुलींना शिक्षण मिळावे म्हणून तालुक्यातील ग्रामीण भागातील कशे ळे व डिकसळ येथे शाळा सुरू केल्या.कशेळे दुर्गम भाग म्हणून ओळ- खला जातो,भाऊसाहेब राऊत विद्यालय कशेळे येथील विद्यालयात बहुतेक विद्यार्थी ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी येत आहेत, या विद्यालयातील शिकत असलेल्या विद्यार्थिनी १० ते १५ किलोमीटर अंतरावरून चालत येत असतात, हे अंतर लक्षात घेता संस्थेचे खजिनदार राहुल तिटकारे आणि सतीश ठाणगे यांच्या प्रयत्नाने व रोटरी क्लब ऑफ ठाणे पूर्व यांच्या माध्यमातून भाऊसाहेब राऊत विद्यालयातील कशेळे व चिंचवली ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी डिस्टिक गव्हर्नर इलेक्ट्रिक कैलास जेठाणी, रोटरी क्लब प्रेसिडेंट ठाणे श्रीरंग केतकर, रोटरी क्लब सेक्रेटरी ठाणे ज्योती जाधवानी, रमेश जाधवानी, यतीश कुरील, सचिन घाग, सुधीर झाडकर, सतीश ठाणगे, राहुल तिटकारे, संस्थेचे सदस्य सूर्याजी ठाणगे, तानाजी मते, सुरेश सावंत, मुख्याध्यापक सिद्धार्थ प्रधान तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. सायकलीचा उपयोग शाळेत येण्या-जाण्यासाठी सोईस्कर होईल, शाळेत वेळेत पोहचता येईल व शाळा सुटल्यावर वेळेत घरी पोहचता येईल तसेच अभ्यास पूर्ण करता येईल या उद्देशाने सायकलींचे वाटप करण्यात आले आहे असे सांगण्यात आले.

# पाली शहरातील अवैध पार्किंग व रस्त्यावर दुकानदारांचे अतिक्रमण करणाऱ्यावर कारवाई होणार का?

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायकांपैकी एक बल्लाळेश्वराचे स्थान असलेले पाली शहर सुधागड तालुक्याची मुख्य बाजारपेठ असल्यामुळे असल्याने येथे गर्दी असते. त्यामुळे शहरात अवैध पार्किंगची समस्या अधिक बिकट बनली आहे. वारंवार वाहतूक कोंडी होऊन वाहनचालक पादचारी गैरसोय होत आहे. हटाळेश्वर चौक ते गांधी चौका कडे जाणाऱ्या मार्गावर अवैध पार्किंग व रस्त्यालगत दुकानदारांचे अतिक्रमन वाढत जात आहेत. वाहनांना व पादचाऱ्यांना मार्ग काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अशा अवैध पार्किंग करणा-या व रस्त्यालगत अतिक्रमण करणाऱ्या दुकांनदारांवर कारवाई होणार तरी केव्हा ? पाली नगरपंचायत मात्र गांधारी सारखे डोळ्याला पट्टी बांधून बसली असल्याचे चित्र पालीत पहायला मिळते.



अनेकवेळा वर्तमानपत्रातून वारंवार बातम्याच्या माध्यमातून समस्यांकडे लक्ष वेधले आहे. आजतागायत या गंभीर समस्यांकडे पाली नगरपंचायत या बाबत कोणतेही पाऊल उचलले नाही. येथील बाजारपेठ रस्ता ,गांधी चौक रस्ता ,जूना एसटी स्टँड परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुचाकी अवैधरित्या पार्किंग केली असतात.

नो पार्किंग'चा फलक काही ठिकाणी बसविण्यात आले असले तरी त्याकडे सर्रास दुर्लक्ष होताना दिसत आहे. काही ठिकाणी दुकान दुकानसोडून पुढेपुढे सरकत रस्त्यालगत दुकाने थाटून बसात आहेत. परिणामी इथून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना पादचाऱ्यांना रस्त्यावरून मार्ग काढताना अडचणी येतात आहेत. पाली ही सुधागड तालुक्यात मुख्य बाजारपेठ असल्याने आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील लोक खरेदारीसाठी पाली येथे येत असतात त्यामुळे दुकानात खरेदीसाठी जाणाऱ्यालोकांचे अवैध पार्किंगमुळे व अवैध दूकान सोडून रस्त्यालगत दुकान थाटणा-यांमुळे गैरसोय होत आहे. या आधी वारंवार अवैध पार्किंगच्या बातमीची पोलिस प्रशासनाकडून साधी दखल घेतली गेली नाही.हि आश्चर्याची बाब आहे. पाली- खोपोली महामार्गावर गाड्या अडवून लायसन, कागदपत्रांची तपासणी केली जाते.कारवाई हि केली जाते. पण पाली शहरांमध्ये असणाऱ्या अवैध पार्किंग बाबत कारवाई का केली जात नाही ? असा सवाल पालीकरांना पडला आहे. या अवैध पार्किंग व रस्त्यालगत होणारे दुकानदारांचे अतिक्रमनाने शहरात तोंडवर काढले आहे. या अवैध पार्किंग विरोधात कारवाई व्हावी रस्ता रस्त्यांनी मोकळा श्वास घ्यावा संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी पालीकर जनतेतून होत आहे.

# उरण नगर परिषदेच्या मिनाताई ठाकरे ग्रंथालयामध्ये गरुडझेप स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी सर्व प्रकारच्या सोई सुविधा म्हणजेच गरुडझेप पवर ऑनलाईन लेक्चर उपलब्ध तसेच आवश्यक बहुतेक विषयाची पुस्तके उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला आहे.

सदरहू विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा उपक्रम उरणमध्ये तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या प्रत्यक्षकृती दर्शक सहभागामुळे उरण नगरपरिषदेचे माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालय , येथे गरूडझेप स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राची स्थापना गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आली.

या अभ्यासिकेचे उदघाटन तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले या प्रसंगी मा. तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि मुख्याधिकारी संतोष माळी यांनी मार्गदर्शन करताना त्यांच्या आठवणी सांगते वेळी सांगितले ह्या सुविधा आम्हाला त्याकाळी उपलब्ध नव्हत्या अथक परिश्रमाने प्रत्येक गोष्ट मिळवावी लागली पुस्तके उपलब्ध करणे तेही सोपे नव्हते आज जिल्हाधिकारी यांनी हि सुवर्ण संधी आपल्याला उपलब्ध करून दिली आहे. याचा जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी वापर करावा त्यातच सर्व विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य दडलेले आहे उदाहरणासह पटवून दिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयाचे ग्रंथपाल सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी केले. या कार्यक्रमाला उरण कला व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रसाद मांडेलकर तसेच तहसील कार्यालयाचे श्री सुरवाडे , उरण नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक सुरेश तेजी, मुकादम, महेन्द्र साळवी, धनेश कासारे, ग्रंथालयाचे जयेश वत्सराज हे उपस्थित होते. कार्यक्रमाअंती विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे आभार मानून ही अतीशय महत्वाची आणि नामी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# कबड्डी स्पर्धेत शिव शंभो पाटणेश्वर अंतिम विजेता

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड कब्बडी असोसिएशनच्या मान्यतेन व सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्रचे उपाध्यक्ष समीर म्हात्रे यांच्या प्रयत्नाने वढाव येथे छत्रपती संभाजी महाराज कोटला मैदानावर नुकत्याच सह्याद्री चषकाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विभागातील ३२ संघांनी भाग घेतला होता. अशी भव्य स्पर्धा वढाव विभागात पहिल्यांदाच झाल्याने अतिशय सुंदर प्रकारे पाड पडली.

सदर सामने अतिशय चुरशीचे झाले. अंतिम सामना शिव शंभो पाटणेश्वर व वायुसुत ओढांगी यांच्यात अतिशय चुरशीचा होवुन पाटणेश्वर संघाने विकी ठाकूरच्या बहारदार खेळीमुळे प्रथम क्रमांक पटकाविला तर द्रितीय क्रमांक वायुसुत ओढांगी, तृतीय क्रमांक हनुमान उचेडे, चतुर्थ क्रमांक गावदेवी मोठेवढाव संघाने पटकाविले. सदर सामन्यांत उत्कृष्ट पक्कड अभिषेक वर्तक गावदेवी मोठेवढाव, उत्कृष्ट चढाई गितेश पाटील वायुसुत ओढांगी, उत्कृष्ट खेळाडू विकी ठाकूर शिव शंभो पाटणेश्वर या खेळाडूंची निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी खास आकर्षण स्वराज्य रक्षक संभाजी मालिकेतील अनाजीपंत याची भूमिका करणारे महेश कोकाटे आणि हिरोजी फरजदची भूमिका करणारे महेश रोकडे यांनी उपस्थित दर्शवली. स्पर्धेचे बक्षीस समारंभ प्रसंगी सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष समीर म्हात्रे, दिव सरपंच विवेक म्हात्रे, मलेघर सरपंच शरद पाटील, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, साज मराठी निर्माते सुनिल पाटील, माजी पोलीस सहाय्यक निरीक्षक विश्वनाथ पाटील, संतोष पाटील, स्वप्निल पाटील, महेश म्हात्रे, गणेश म्हात्रे, पांडुरंग पाटील, नितिन म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



# मिशन २०२४ ऑलिम्पिकसाठी स्वस्तिका घोष लागली तयारीला; टार्गेट ऑफ ऑलिम्पिक पोडियम अंतर्गत टेबल टेनिस पटू स्वस्तिका संदीप घोषची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**



२०२४ मध्ये पॅरिस ऑलिम्पिक होणार असून त्यासाठी भारता- तून प्रतिभावंत खेळाडूंची निवड होणार आहे. त्यानुसार भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर स्पोर्ट्सच्या वतीने टार्गेट ऑफ ऑलिम्पिक पोडियम अंतर्गत डेव्हलोपमेंट स्कीम आणि कोड ग्रुप स्कीमसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची विद्यार्थिनी टेबल टेनिस पटू स्वस्तिका संदीप घोष हिची निवड झाली आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. ०५ एप्रिल) स्वस्तिकाचे अभिनंदन करून तिला पुढील यशस्वी वाटचालकरीता शुभेच्छा दिल्या.

यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, क्रीडा शिक्षक डॉ. विनोद नाईक, स्वस्तिकाचे वडील संदीप घोष उपस्थित होते. जागतिक दर्जाच्या खेळाडूंची असलेली ऑलिम्पिक स्पर्धा दर चार वर्षांनी होत असते. आगामी ऑलिम्पिक स्पर्धा पॅरिस देशात होणार आहे. पूर्वी या स्पर्धेत एखाद दुसरे पदक आपल्या देशाला प्राप्त व्हायचा. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा विभागाला बळ देण्याचे काम केले आणि ऑलम्पिक मध्ये भारताने कामगिरीचा आलेख उंचविला. तसेच 'खेलो इंडिया युथ गेम' उपक्रमातून देशातील प्रतिभावंत खेळाडू उदयास आले. त्याचप्रमाणे स्वस्तिका घोष ने सुद्धा 'खेलो इंडिया युथ गेम' या टेबल टेनिस राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी केली होती. स्वस्तिकाने प्राथमिक शिक्षणापासूनच टेबल टेनिस मध्ये सहभाग घेतला असून सातत्याने सराव आणि त्या अनुषंगाने मेहनत घेतली, त्यामुळे तिने राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सातत्याने दैदिप्यमान कामगिरी केली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावी पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे प्रथम वर्षाचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने दे- शात व परदेशात झालेल्या टेबलटेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. हाँगकाँग, स्पेन, जॉर्डन, कोलंबो, फ्रांस यांसह इतर देशामध्ये झालेल्या स्पर्धेत स्वस्तिकाने अजिंक्यपद पटकाविले आहे. स्वस्तिकाने लह- ानपणापासून टेबलटेनिस खेळात आपली आवड व नैपुण्य दाखविले आहे. त्यामुळे तीला 'विराट कोहली फाऊंडेशन' कडून स्कॉलरशिप प्राप्त झाली आहे. ती भारतातील एकमेव टेबल टेनिस खेळाडू आहे, जी या संस्थेद्वारे स्कॉलरशिपसाठी निवडली गेली आहे. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. ओमान येथे झालेल्या 'ओमान ओपन' स्पर्धेत भारतीय कर्णधार म्हणून यशस्वी जबाबदारीही स्वस्तिकाने पार पडली, त्यावेळी या स्पर्धेत तीने कांस्य पदक मिळविले आणि पदक मिळविणारी भारताची एकमेव खेळाडू ठरली. स्वस्तिकाने २०१३ मध्ये गुजरातमध्ये राष्ट्रीय रँकिंग सेंट्रल झोन टेबल टेनिस चॅम्पियनशिप जिंकली आणि त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. प्रत्येक वर्षी तिने आपल्या खेळातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती दाखविली आहे. दोन वर्षांपूर्वी पुणे येथे राज्य सरकारच्या माध्यमातून झालेल्या स्पर्धेतही स्वस्तिकाने सुवर्णयश कामगिरी केली. केंद्र शासनाच्या विविध क्रीडा प्रकार असलेल्या 'खेलो इंडिया युथ गेम' या स्पर्धेतही तिने नेत्रदिपक कामगिरी केली होती. त्याचप्रमाणे '८२ व्या ज्युनिअर अँड युथ नॅशनल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२०' राष्ट्रीय स्पर्धेत विजेतेपदाचा 'किताब जिंकले.

स्वस्तिका घोषने आपल्या खेळात सातत्य ठेवले आहे त्यामुळे सध्या ती ऑल इंडिया महिला खुल्या गटातील रँकिंगमध्ये सातव्या क्रमांकावर आहे. भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर स्पोर्ट्सच्या वतीने टार्गेट ऑफ ऑलिम्पिक पोडियम अंतर्गत डेव्हलोपमेंट स्कीम आणि कोड ग्रुप स्कीमसाठी महाराष्ट्रातून दोन तर देशातून सात खेळाडूंची निवड झाली आहे. स्वस्तिकाच्या चमकदार कामगिरीमुळे तिचा समावेश झाला आहे. मिशन ऑलिम्पिक २०२४ अनुषंगाने स्वस्तिका जागतिक दर्जाचा सराव आणि पूर्व तयारी करण्यासाठी ऑस्ट्रिया देशात जाणार असून तिला चीन देशातील सुप्रसिद्ध प्रशिक्षक युन जुन लिव्ह यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच तिला दरमहा २५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीसुद्धा मिळणार आहे.

> लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीसाठी सातत्याने सर्वोत्तपरी मदत केली आहे. गेल्या १० वर्षांपासून स्वस्तिकाला सरावासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी इनडोअर हॉल उपलब्ध करून दिला असून गेल्या तीन वर्षांपासून वातानुकूलित इनडोअर हॉल दिला आहे. तसेच प्रशिक्षणासाठी वेळोवेळी त्यांच्याकडून आर्थिक मदत, तसेच मार्गदर्शन लाभत आहे. त्यामुळे मी तिचा पालक आणि प्रशिक्षक असलो तरी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आशीर्वाद आमच्यासाठी महत्वपूर्ण ठरला आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच महाविद्यालयाचे आभार मानतो.
>
> **- संदीप घोष**
> **(स्वतिकाचे पालक व प्रशिक्षक)**

# परसुलेतील राजिप शाळेसाठी आ.भरत गोगावले यांचे प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील परसुले येथील रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा गेल्या पावसाळ्यामध्ये संपूर्ण कोसळल्याने लक्ष्मी ऑरगॅनिक लिमिटेड कंपनीच्या सामाजिक दायित्व या उपक्रमाअंतर्गत परसुले राजिप शाळेच्या इमारत बांधकामाचा शुभारंभ कंपनी व्यवस्थापन आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत आ.भरत गोगावले यांच्याहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी आ. गोगावले यांनी परसुले येथे यापूर्वी रायगड जिल्हा परिषद शाळेच्या फक्त चार वर्ग खोल्या होत्या. पण आता कंपनी व्यवस्थापनामार्फत अद्ययावत आणि प्रशस्त अशा सात खोल्या तसेच शौचालय, मुलांना खेळण्यासाठी मैदान इत्यादी सुविधांसह ही शाळा उभी राहणार असल्याने ही शाळा पोलादपूर तालुक्यातील अग्रक्रमाने सुसज्ज शाळा असेल, असा आशावाद व्यक्त केला. आ.गोगावले यांनी, ज्या कंपनीने आपल्या ग्रामीण भागातील जनतेसाठी फिरता दवाखाना सुरू केला ती लक्ष्मी कंपनी ही एकमेव महाड औद्योगिक क्षेत्रातील कंपनी आहे. लक्ष्मी कंपनी व्यवस्थापन या भागातील लोकांना नेहमीच सहकार्य करत आले असल्याबद्दल आ.गोगावले यांनी कंपनी प्रशासनाचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित कंपनीचे सीईओ सतेज नाबर, प्रशांत पाटील, प्रमोद सानप, समीर जोहरी, समीर तेलवणे, विक्रम शिंदे, योगेश पाटील, अजय घुगे, शिवसेना विभाग प्रमुख सतीश शिंदे,लक्ष्मण मोरे, परसुले सरपंच सुनंदाताई कदम, शिवसैनिक प्रभाकर पवार आणि परसुले ग्रामस्थ उपस्थित होते.

परसुले प्राथमिक शाळा बांधण्याकामी आ. भरत गोगावले यांनी कंपनी प्रशासनाकडे विशेष पाठपुरावा केल्यामुळे या कामाचा शुभारंभ त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे,असे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले. यावेळी परसुले ग्रामस्थांनी आ.गोगावले यांच्यासह कंपनी प्रशासनाचे आभार मानले.





**पनवेल मधील रेखी वाईन्स शॉपचे मालक पप्पुशेठ व हितेश चंद्रशेखर भोपी (पत्रकार शेखर भोपी) यांचे चिरंजीव या दोन्ही मित्रांचा वाढदिवस एकाच दिवशी असल्याने दोघांनी केक कापुन साजरा केला. यावेळी अनेकांनी त्यांना वाढदिवसाच्या भ्रमणध्वनी वरून तसेच भेटुन शुभेच्छा दिल्या.**


## कु.अमृता सुनील पेठे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक
पेठे परिवार